Vol-13 Special Issue- 2.1 ISSN- 2349-7076

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter)
Patron: Prof. R. G. Kothari
Chief Editor: Prof. Jignesh B. Patel
Email:- Mo. 9429429550 ctefeduinspire@gmail.com

# माध्यमिक स्तरावर भूगोल विषयात कलेचा उपयोग : एक चिकित्सक अभ्यास

**निलिमा दे. अंबाडकर**
संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती

**शीला जे. मसराम**
संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती

## सारांश

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार कला-संलग्न अध्यापन (Art Integrated Learning) ही विद्यार्थीकेंद्रित व अनुभवाधारित अध्यापन पद्धती आहे. भूगोल विषयात नकाशे, चित्रकला, रांगोळी, मॉडेल्स, पोस्टर, लोककला, नाट्य, गीते आणि हस्तकलेचा वापर केल्याने विद्यार्थ्यांची संकल्पना स्पष्ट होते, निरीक्षणशक्ती, सर्जनशीलता आणि चिकित्सक विचारशक्ती विकसित होते. प्रस्तुत संशोधन लेखामध्ये माध्यमिक स्तरावरील भूगोल अध्यापनात कलेचा उपयोग, त्याचे शैक्षणिक परिणाम, फायदे, मर्यादा व सुधारणा यांचा चिकित्सक अभ्यास करण्यात आला आहे.

**मुख्यशब्द** :- भूगोल, कला-संलग्न अध्यापन, माध्यमिक शिक्षण, अनुभवाधारित शिक्षण, NEP 2020

## प्रस्तावना :

भूगोल हा पृथ्वी, पर्यावरण आणि मानवी जीवनाशी संबंधित विषय आहे. पारंपरिक व्याख्यान पद्धतीपेक्षा कला-संलग्न अध्यापन विद्यार्थ्यांना अधिक सक्रिय बनवते. चित्रकला, नकाशा रचना, मातीची प्रतिकृती, लोककला आणि नाट्य यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना भूगोलातील संकल्पना सहज समजतात. NCERT ने माध्यमिक स्तरासाठी Art Integrated Learning ला महत्त्व दिले आहे.

## संशोधनाची उद्दिष्टे

भूगोल विषयात कलेच्या वापराचे महत्त्व अभ्यासणे.
कला-संलग्न अध्यापनाचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर होणारा परिणाम अभ्यासणे.
भूगोल अध्यापनातील कलेच्या वापरातील अडचणी शोधणे.

## संशोधन प्रश्न:-

भूगोल विषयात कला-संलग्न अध्यापन कितपत प्रभावी आहे?
विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेवर त्याचा काय परिणाम होतो?
कलेच्या माध्यमातून भूगोल विषय शिकविणारा शिक्षकांना कोणत्या अडचणी येतात?

## संशोधन पद्धती:-

**संशोधन प्रकार** : गुणात्मक (Qualitative)

**संशोधन रचना** : चिकित्सक व वर्णनात्मक

**माहितीचे स्रोत** : पुस्तके, संशोधन लेख, NCERT मार्गदर्शिका, NEP 2020, नियतकालिके.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

## साहित्याचा आढावा:-

Mohalik व Basu (2020) यांच्या संशोधनात कला-संलग्न अध्यापनामुळे भूगोलातील संकल्पनात्मक समज वाढल्याचे आढळले.

Sarfaraz Alam (2021) यांनी भारतातील माध्यमिक भूगोल अध्यापनातील आव्हाने व अध्यापन पद्धतींचा आढावा घेतला.

NCERT च्या Art Integrated Learning मार्गदर्शिकेत कला-संलग्न अध्यापनामुळे अनुभवाधारित शिक्षण, सर्जनशीलता व चिकित्सक विचारशक्ती विकसित होते असे नमूद केले आहे. भूगोलातील नकाशे, हवामान, स्थलरूपे, नैसर्गिक संसाधने, लोकसंख्या, शेती इत्यादी घटक कलात्मक उपक्रमांद्वारे शिकविल्यास विद्यार्थी अधिक सक्रिय होतात.

## फायदे :-

संकल्पना स्पष्ट होतात.

नकाशा कौशल्य विकसित होते.

सर्जनशीलता वाढते.

गटकार्य व संवादकौशल्य विकसित होते.

अध्ययन आनंददायी बनते.

## मर्यादा :-

वेळेचा अभाव.

आवश्यक साहित्याची कमतरता.

प्रशिक्षित शिक्षकांची आवश्यकता.

मूल्यमापनातील अडचणी.

## निष्कर्ष :-

भूगोल विषयात कलेचा समन्वित वापर विद्यार्थ्यांचे संकल्पनात्मक आकलन, सर्जनशीलता, चिकित्सक विचारशक्ती आणि सहभाग वाढवतो. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या उद्दिष्टांनुसार कला-संलग्न अध्यापन ही प्रभावी अध्यापन पद्धती आहे. यशस्वी अंमलबजावणीसाठी शिक्षक प्रशिक्षण, आवश्यक साधनसामग्री आणि योग्य मूल्यमापन पद्धती विकसित करणे आवश्यक आहे.

Teacher's Welfare is Nation's Welfare
CTEF
Council for Teacher Education Foundation
ESTD. 1985

## संदर्भ ग्रंथ (References)

National Council of Educational Research and Training (NCERT). Art Integrated Learning: Guidelines for Secondary Stage.

Mohalik, R. & Basu, M. (2020). Effectiveness of Arts Integrated Learning in Developing Conceptual Understanding in Geography at Elementary Level.

Sarfaraz Alam, S. (2021). An Overview of Geography Teaching in Secondary Schools of India.

National Education Policy (NEP), 2020.

NCERT. Learning Outcomes at the Secondary Stage.

C.S., A. & Babu, K.N.C. (2020). Art Education in the Secondary Schools of Southern India.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

Singh, N. & Verma, V. (2024). Relevance of eContent in Learning-Teaching of Geography with Special Reference to School Education in India.

NCERT Journals

Teacher's Welfare is Nation's Welfare
CTEF
Council for Teacher Education Foundation
ESTD. 1985